Date: 03/11/2014

# Media Coverage for Run for Unity

## Dainik Pudhari (Pimpri Chinchwad Page. No.3)

### 'रन फॉर युनिटी' आकुर्डीत कार्यक्रम

पिंपरी : प्रतिनिधी

आकुर्डी येथील डॉ. डी.वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या विद्यार्थ्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जंयंतीनिमित्त 'रन फॉर युनिटी'चे आयोजन केले होते.

यानिमित्त काढण्यात आलेली मॅरेथॉन धर्मराज चौक, हुतात्मा चौक, डॉ. हेगडेवार चौक, आकुर्डी रेल्वे स्टेशन ते इन्स्टिट्यूट पर्यंत काढण्यात आली. प्रा. नंदिनी देसाई, प्रा. शिवाजी माने यांनी आयोजन केले. या वेळी प्रा. डॉ. मुर्झबान जाल यांचे व्याख्यान झाले. संचालक कर्नल डॉ. कैलाश चंद यांनी मनोगत व्यक्त केले. मृणाल सावले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शिल्पा कानकोनकर यांनी आभार मानले.

विंग कमांडर (नि.) पी.व्ही. सी.पाटील, भरत चव्हाण पाटील, रिचा चव्हाण पाटील, प्रा. डी.आर. कस्तुरे आदींनी मार्गदर्शन केले.

Date: 02/11/2014

# Media Coverage for Run for Unity

## Dainik Lokmat
## Pimpri Chinchwad Page. No 4

### रन फॉर युनिटी

पिंपरी : आकुर्डी येथील पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या विद्यार्थ्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'रन फॉर युनिटी'चे आयोजन केले. संस्थेचे संचालक कर्नल डॉ. कैलास चंद (निवृत्त), प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले.

हुतात्मा चौक, डॉ. हेडगेवार चौक, आकुर्डी रेल्वे स्टेशनमार्गे दौड काढण्यात आली. प्रा. नंदिनी देसाई, प्रा. शिवाजी माने यांनी आयोजन केले. इन्स्टिट्यूटमध्ये प्रा. डॉ. मुर्झबान जाल यांचे व्याख्यान झाले. (प्रतिनिधी)

Newspaper- Pudhari

Date of Publication- 15/10/2014.

Page No. - 07

Name of the Event- Voting Awareness Rally.

Date of Event- 13/10/2014

# मतदान जागृतीसाठी विद्यार्थ्यांची रॅली

पिंपरी : प्रतिनिधी

आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मतदान जागृती रॅलीचे आयोजन केले होते. काल ही रॅली इन्स्टिट्यूटपासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, भेळ चौक, संभाजी चौक, आकुर्डी रेल्वे स्टेशन, धर्मराज चौक आणि पुन्हा इन्स्टिट्यूट यामार्गे काढण्यात आली. या रॅलीमधून एनएसएसमधील ५० स्वयंसेवकांनी लोकांना मतदान करण्याचे आवाहन केले. एनएसएसचे समन्वयक शिवाजी माने यांनी रॅलीमधील मुलांना मार्गदर्शन केले. सर्व स्वयंसेवकांनी मतदान करण्याची शपथ घेऊन इन्स्टिट्यूटच्या प्रांगणात रॅलीची सांगता झाली.

Media Coverage for Nirmalya collection
Date - 10/09/2014

दैनिक लोकमत

## विद्यार्थ्यांनी गोळा केले निर्माल्य

पिंपरी : आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५० स्वयंसेवकांनी सोमवारी पवना नदी घाटावर निर्माल्य जमा केले.

चिंचवड येथील लाईफलाइन मेडिकल फाउंडेशनतर्फे चिंचवड येथील पवना नदी घाटावर निर्माल्य जमा करण्यात आले. नदीपात्रात टाकलेले निर्माल्य बाहेर काढण्यात आले. या वेळी फाउंडेशनचे सुभाष गलांडे, भाऊसाहेब निकम, अजित जाधव, पंढरी कोरे, किरण सोळंकी आदींनी सहभाग घेतला. (प्रतिनिधी)

दैनिक सकाळ

# रावेत, विकासनगरमध्ये युवकांकडून पर्यावरणजागृती

**रावेत** : रावेत, विकासनगर, किवळे भागात घरगुती व सार्वजनिक मंडळांच्या गणपतींचे उत्साहात विसर्जन झाले. 'पुढच्या वर्षी लवकर या,' अशी भावना व्यक्त करत ढोल-ताशांचा गजर, 'डीजे'च्या तालावरील नृत्य अन् गुलाल उधळत भाविकांनी लाडक्या बाप्पाला निरोप दिला.

विकासनगरमधील शिवछत्रपती मंडळाने सजविलेल्या रथातून मिरवणूक काढली. किवळे गावठाणातील बापदेव मंडळाने बाप्पासाठी फुलांनी सजविलेला मयूर रथ केला होता. डीजे व ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक झाली. भोंडवेवस्तीवरील गणेश युवा प्रतिष्ठानच्या मंडळाने शिस्तबद्ध ढोल पथकाने सर्वांचीच मने जिंकली. गुरुद्वारा चौकातील शिवप्रेमी विद्युत रोषणाई केलेल्या मयूर रथातून गणपतीची मिरवणूक काढली होती. पवना नदी घाटावर निगडी, प्राधिकरण, रावेत, वाल्हेकरवाडी, आकुर्डी रेल्वे स्टेशन, गुरुद्वारा चौक या भागात मूर्तींचे विसर्जन झाले. पर्यावरणप्रेमी 'निसर्गराजा मित्र जिवांचे' या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी निर्माल्य जमा केले. डी. वाय. पाटील महाविद्यालय व्यवस्थापनशास्त्र शाखेच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी निर्माल्य जमा केले. निर्माल्य नदीपात्रात न टाकता कुंडात जमा करण्याचे आवाहन त्यांनी भाविकांना केले. प्रा. शिवाजी माने यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविला. महापालिका आरोग्य विभागाचे संजय गेंजे व शिवाजी तुपे यांनी स्वच्छतेबाबत नागरिकांना आवाहन केले. नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी घाटावर सार्वजनिक मंडळांचे स्वागत केले. किवळेत नगरसेवक बाळासाहेब तरस यांनी मंडळाचे स्वागत केले.